Publication: Prahaar
Date: 24/8/2019
Page: 2
Column: 1

प्रहार
शनिवार, २४ ऑगस्ट २०१९

## वेचक

# अदानी इलेक्ट्रिसिटीचे बिल भरण्यासाठी दहिसरमध्ये सुविधा

**मुंबई :** ग्राहककेंद्री कटिबद्धता ठेवताना अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई लि.ने (एईएमएल) सुलभ बिल भरण्यासाठी दहिसरमधील शैलेंद्र एज्युकेशन सोसायटीजवळील अदानी रिसीव्हिंग केंद्रामध्ये चौथे स्वयं-देयक किओस्क 'जिनिअस पे' सुरू केले. या यंत्रणेमुळे ग्राहकांना आता अधिक काळ रांगेमध्ये उभे राहावे लागणार नाही. यात धनादेश, रोख, डेबिट/क्रेडिट कार्डसच्या माध्यमातून देयके स्वीकारण्यात येतील. ग्राहकांसाठी जिनिअस पे सेवा रोज सकाळी ७ ते रात्री ११ वाजेपर्यंत उपलब्ध असेल. ग्राहक किओस्क मशिन्सच्या माध्यमातून बिलांच्या डुप्लिकेट कॉपीज देखील प्राप्त करू शकतात.